वाचले :-

(१) मुख्याधिकारी, नगर परिषद श्रीवर्धन यांजकडील पत्र क्र. जा.क्र. श्रीनप/बांध/कात-१/ शासकीय जागा मागणी प्रस्ताव/१२९२/२०४-०५ दि. ०१/०३/२००५.

(२) तहसिलदार श्रीवर्धन यांचेकडील पत्र क्र.जमीन/कात-१/ज.मा.न.पा/१२७५/०७ दि. १२/०७/२००७ व दि. १५/१२/२००९

(३) उपविभागीय अधिकारी, महाड यांचेकडील पत्र जा.क्र.जमीन/कावि-३/जि.त./ ६४१७/ ६५५/०९ दि. १७/१२/२००९.

(४) सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांचेकडील जा.क्र. ससंनर-राअ/ मौ.श्रीवर्धन/ता.श्रीवर्धन/गा.न.नं. १४/अ.क्र.२/भूवनाळे तळे/जागा हस्तांरण/ ३७० दि.८/२/०६ व दि. ०५/०३/२०१०

(५) शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र. एलएनडी-१०९०/प्र.क्र.१८१/ज-१ दि. १२/१०/१९९० मधील परि.(दोन)

(६) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक- जमीन-२८१०/ प्र.क्र.२९३/ ज-४ दि. १२/०९/२०१२.

(७) शासन, महसूल व वन विभागाकडील शुध्दीपत्रक क्रमांक- जमीन-२८१०/ प्र.क्र.२५/ ज-४(अ) दि. ११/०१/२०१३.

(८) सह जिल्हा निबंधक, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.श्रीवर्धन/मुंल्याकन/२०१२/ २६९ दि.१८.०१.२०१३

(९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २२.

(१०) कार्यालयीन मंजूर टिपणी दि. १८/०१/२०१३.

---

क्र.मशा/जमीन/अ-२/१२६४८२/२०१३
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक १८/०१/२०१३

**आदेश**

२/- उपोद्घातातील अ.क्र. १ कडील पत्रान्वये मुख्याधिकारी श्रीवर्धन नगरपरिषद यांनी मौजे-श्रीवर्धन येथील गा.न.नं. १४ मधील अ.क्र. ४ जिवनेश्वर तळयाचे क्षेत्र ०.३६.०० हे.आर. जमीन नगरपालिकेकडे "तळयाचे सुशोभिकरण व.तदनुषांगिक इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी" हस्तांतरीत करण्यास विनंती केली आहे.

३/- उपोद्घातातील अ.क्र. ६ व ७ अन्वये मौजे -श्रीवर्धन येथील गा.न.नं. १४ मधील अ.क्र. ४ जिवनेश्वर तळयाचे ०.३६.०० हे.आर. क्षेत्र श्रीवर्धन शहराचा सुधारीत विकास आराखडा मंजूर झाला असल्याने, महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. ०४/०२/१९८३ व दि. १२/१०/१९९० मधील परि.(दोन) अनुसार नगर परिषदा / नगर पालिका/ यांच्या क्षेत्रात विकास आराखडयात जमीन राखून ठेवलेली असेल तर त्या जमिनीचा किफायतशीर उपयोग आहे किंवा कसे हे लक्षात न घेता, त्या जमिनीकरीता प्रारुप विकास आराखडयाचा मसुदा प्रसिध्द झालेल्या दिवशी म्हणजेच दि. १२/०४/१९८४ मध्ये असलेल्या शासकीय जमिनीच्या बाजारमुल्याची रक्कम आकारुन श्रीवर्धन नगरपालीकेकडे तळयाचे सुशोभिकरण व तदनुषांगिक इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी हस्तांतरीत करण्यास अटी/ शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात आली आहे.

४/- सह जिल्हा निबंधक, रायगड-अलिबाग यांनी वरील प्रश्नाधिन जमिनीचे दि. १२/०४/ २८४ रोजी असलेले बाजार मुल्यांची रक्कम रु.९९,०००/- (नव्यान्नव हजार मात्र) कळविण्यांत आलेली आहे.

५/- वरील वस्तुस्थिती विचारात घेता, जिवनेश्वर तळयाचे सुशोभिकरणाचे निकड लक्षात घेता मुख्याधिकारी श्रीवर्धन नगरपरिषद यांजकडे मौजे -श्रीवर्धन येथील गा.न.नं. १४ मधील अ.क्र. ४ जिवनेश्वर तळयाचे क्षेत्र ०.३६.०० हे.आर. जमीन नगरपालिकेकडे "तळयाचे सुशोभिकरण व तदनुषांगिक इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी" वरील बाजारमूल्याची रक्कम शासन जमा करण्याच्या अटीवर तसेच मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २२ अन्वये खालील अटी/शर्तीवर हस्तांतरीत करण्याचे आदेश देत आहे.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

(१) विषयांकित जमीन नगरपालिका परिषद, श्रीवर्धन भोगवटादार वर्ग दोन म्हणून धारण करील.

(२) विषयांकित जमिनीचा वापर मंजूर प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी करता येणार नाही.

(३) विषयांकित जमिनीचे शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरण/ गहाण/ तारण/ बक्षिसपत्र करता येणार नाही. शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पुर्व परवानगीशिवाय हस्तांतरण/ गहाण/ तारण/ बक्षिसपात्र केल्यास सदर जमीन शासन जमा करण्यात येईल.

(४) मंजूर जमिनीचा मंजूर प्रयोजनासाठी २ वर्षात वापर न केल्यास जमीन शासन जमा करण्यांत येईल.

(५) सदर जागेत नगरपरिषदेने अपेक्षिलेला तळयाचे सौदर्यीकरण करणे, बोटींग, कारंजे बसविणे असा वापर अनुज्ञेय होऊ शकेल. तथापि सदर वापर नगरपरिषद क्षेत्रातील सर्व लोकांसाठी कायमस्वरुपी खुला राहील व त्यावर भविष्यात कोणतेही बांधकाम होणार /करण्यात येणार नाही. यासबंधी श्रीवर्धन नगरपरिषदेस सदर जमिनीचा ताबा देण्यापूर्वी नगर परिषदेकडून हमीपत्र प्राप्त करुन घ्यावे.

(६) नगरपरिषद श्रीवर्धन यांनी मंजूर जमिनीची मोजणी करुन त्याप्रमाणे सिमांकन करुन घेण्यात यावे.

(७) मंजूर केलेल्या जागेमध्ये कुणाचेही अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी श्रीवर्धन नगरपरिषद याची राहील.

(८) जमिनीची आवश्यकता नसल्यास ती पुन्हा महसूल विभागाकडे हस्तांतरीत करण्यात यावी.

(९) शासनाने दिलेली जमीन परत घेतल्यास, त्याकरीता नगरपालीका यांनी जमिनीकरीता किंवा त्यांच्यावर कोणत्याही विकासाकरिता केलेल्या खर्चाची भरपाई मिळणार नाही.

(१०) प्रश्नाधिन जमिनी संदर्भात काही वाद उद्‌भवल्यास त्यांचे निरासन करणे हे नगरपरिषदेवर बंधनकारक राहील.

(११) वरील पैकी कोणत्याही अटी/ शर्तीचे पालन न केल्यास किंवा कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्याचे आढळल्यास उक्त जमीन असेल त्या स्थितीत शासन जमा करण्यात येईल

सही/-एच.के.जावळे
**जिल्हाधिकारी रायगड**

प्रत :- मुख्यधिकारी, नगरपरिषद श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांजकडे.

प्रत :- तहसिलदार श्रीवर्धन यांजकडे माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी

२/- मंजूर केलेल्या जमिनीचा ताबा देण्यापूर्वी नगरपरिषद श्रीवर्धन यांजकडून वर नमूद केलेली बाजारमूल्याची रक्कम शासन जमा करुन घ्यावी तसेच अट क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नगरपरिषद श्रीवर्धन यांजकडून हमीपत्र घ्यावे. त्यानंतरच मंजूर जमिनीचा ताबा देण्यात येवून गांव कागदोपत्री अंमल देऊन संबंधित कागदपत्रासह अहवाल सादर करावा.

प्रत :- उपविभागीय अधिकारी, महाड यांना माहितीसाठी.

प्रत :- उप अधिक्षक, भूमी अभिलेख श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन नवी मुंबई ४०० ६१४ यांजकडे माहितीसाठी सादर.

प्रत :- अपर मुख्य सचिव, (महसूल व वन विभाग) ज-४, मंत्रालय मुंबई ४०० ०३२ यांजकडे माहितीसाठी सादर.

प्रत :- आदेश संचिका.

१८।१।१३

जिल्हाधिकारी रायगड करिता.

**वाचले** :- १) मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई अ.शा.पत्र क्रमांक: आवगृ २०११/प्र.क्र.११७/का.१२ दिनांक १९ एप्रिल,२०११.
२) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जि.रायगड यांचे पत्र क्र. जमीन -२०१०/प्र.क्र.२१/का.१(४) /४०२२ दिनांक ११/०७/२०११.
३) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्रमांक:जमीन ०७/२००९/प्र.क्र.८९/ज-१ दिनांक २५ मार्च,२०१०.
४) उपविभागीय अधिकारी माणगांव यांच्याकडील पत्र क्र.जमीन/कावि-२/८०२७/२०१२ दिनांक ०३/१२/२०१२,
५) सहाय्यक संचालक, नगर रचना रायगड अलिबाग यांजकडील पत्र जा.क्र. ससंनर/राअ/जागा अनुदान/मौ.पाली/ता.सुधागड/५८८१ दिनांक २२/११/२०११ व पत्र जा.क्र.ससंनर-राअ/जागा अनुदान/मौ.पाली/ता.सुधागड/५७४ दि. ०५/०२/२०१३.
६) शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक: जमीन०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दिनांक २७/०७/२०११ व परिपत्रक क्र.जमीन ०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१ दि.३०/११/२०१२.
७) शासन, आदिवासी विभाग विभाग, निर्णय क्रमांक : शावगृह-२००६/प्र.क्र.६५/का.१२ दि. ०६/१२/२००७
८) प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, जि.रायगड यांचे पत्र जा.क्र. वगृ- २०१२/प्र.क्र.३१५ /का.१(४) /५७४५ दिनांक २७/११/२०१२
९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २२ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम ६
१०) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक ०८ /०२/२०१३.

---

क्र.मशा/जमीन/अ-६/१४२७५७/२०१३
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड,
अलिबाग, दिनांक:- ११ /०२/२०१३.

**आदेश**

मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांजकडील दिनांक २९/०४/२०११ च्या अ.शा.पत्रान्वये रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यामध्ये आदिवासी विकास विभागाकडून चालविल्या जाणाऱ्या आदिवासी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृहसाठी शासकीय जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. तसेच प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक ११/०७/२०११ अन्वये मौजे पाली, ता. सुधागड, जि.रायगड येथील स.नं. ७८/६क एकूण क्षेत्र ०.६१.०० हे.आर जमीन आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह सुधागडसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

उपविभागीय अधिकारी, माणगांव यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३/१२/२०१२ च्या पत्रान्वये मौजे पाली, ता. सुधागड, जि.रायगड येथील स.नं. ७८/६क एकूण क्षेत्र ०.६१.०० हे.आर जमीन आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह सुधागडसाठी प्रस्तावित केली आहे. प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांनी त्यांच्याकडील पत्र क्र. जमीन-२०१२/प्र.क्र.३१५/का.१(४)/५७४५ दि. २७/११/२०१२ अन्वये मौजे पाली, ता. सुधागड, जि.रायगड येथील स.नं. ७८/६क एकूण क्षेत्र ०.६१.०० हे.आर जमीन आदिवासी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृहासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यास विनंती केली आहे. तसेच सदर पत्रासोबत शासन, आदिवासी विभाग यांचेकडील निर्णय, क्रमांक :शावगृ-२००६/ प्र.क्र.५०/का.१२, दि.६/१२/२००७ अन्वये वसतीगृहे सुरु करण्यासाठी मंजुरी देण्यात आल्याबाबत व मुख्यवास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, सार्वजनीक बांधकाम विभाग, मुंबई यांनी शासकीय

वसतीगृहाचे बांधकामाचे सुधारीत आराखडयास मंजुरी दिल्याबाबतचे पत्र जा.क्र.मुवाशा/आदि.वसति.न./प-३/२०२ दि. १७/०२/२०११ जोडले आहे.

सहाय्यक संचालक, नगररचना रायगड अलिबाग यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक २२/११/२०११ अन्वये मजूंर रायगड प्रादेशिक योजनेतंर्गत पाली सुधागड परिसर विकास नुसार संपुर्ण स.नं. ७८ हा रहिवास वापर विभागात समाविष्ट आहे. त्यामुळे सदर जागेवर प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे शैक्षणिक तत्सम वापरातंर्गत वसतीगृह हा वापर अनुज्ञेय करता येईल. तथापी, तत्पुर्वी सदर रस्त्यास किमान १२.० मी. रुंदीचा विद्यमान रस्ता उपलब्ध होत असल्याची खात्री करुन हरकत नसल्याबाबत अभिप्राय दिलेले आहेत. रस्त्याबाबत तहसिलदार सुधागड यांचे अभिप्राय घेतले असता, त्यांनी दि. ३०/०१/२०१२ च्या पत्रान्वये प्रस्तावित जागेमध्ये जाणे-येण्यासाठी पाली-शिळोशी-मढाली हा इतर जिल्हा मार्ग क्र. १३ असा रस्ता उपलब्ध आहे. त्यानुसार सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग यांनी दि. ०५/०२/२०१३ च्या पत्रानुसार विषयांकित जागेत इतर जिल्हा मार्ग हा पोच रस्ता उपलब्ध असल्यामुळे सदरील जागेमध्ये वसतीगृह हा वापर अनुज्ञेय करता येईल, असे फेर अभिप्राय दिलेले आहेत.

उपोद्घातांत अनु.क्र. ६ कडे नमुद केलेल्या शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय दिनांक २७ जूलै,२०११ नुसार शासकीय शाळा/आश्रमशाळा/शासकीय वसतीगृह यासाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार १ हेक्टर पर्यन्त शासकीय जमिनींचा, जमिनीची मागणी शासकीय प्रकल्पासाठीच असल्याची व त्यास सक्षम प्राधिका-याची/विभागांची प्रशासकीय मान्यता आहे याची खात्री करण्याच्या, जमिनीचे आरक्षणाबाबत खात्री करण्याच्या तसेच ताबा देण्यापूर्वी शासन ठरवून देईल त्या अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी हमीपत्र घेण्याच्या अटीवर आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. शासन, महसूल व वन विभागाकडील परिपत्रक दिनांक ३०/११/२०१२ मधील सुचनांनुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा देताना, जमिनींची खरीखुरी आवश्यकता विचारात घेऊन, ती महसूल मुक्त व भोगवटामूल्यरहीत पध्दतीने देण्याबाबत सुचना आहेत.

उपोद्घातातील अनु.क्र. ८ कडील पत्रान्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांनी आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृह सुधागड साठी प्रशासकीय मान्यता असलेल्या शासन, आदिवासी विभागाकडील निर्णय, क्रमांक:शावगृ-२००६/प्र.क्र.५०/का.१२, दि. ६/१२/२००७ ची छायाप्रत सादर केली आहे. तसेच आगाऊ ताबा देण्यापूर्वी शासन ठरवून देईल त्या अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी हमीपत्र देखील सादर केले आहे.

वरील बाबी विचारात घेऊन, मौजे पाली, ता.सुधागड, जि.रायगड येथील स.नं. ७८/६क एकूण क्षेत्र ०.६१.०० हे.आर जमीन **"आदिवासी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृह सुधागड"** साठी शासनाचे जमीन मंजूरीच्या अंतीम मान्यतेस अधीन राहून आणि खालील अटी व शर्तीवर आदिवासी विकास विभागाकडे आगाऊ ताबा देण्याचे आदेश देत आहे.

**अटी व शर्ती**

१) सदर जमिनीचा आगाऊ ताबा आदिवासी विभागाकडे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांचे मार्फत देण्यात येत आहे.